हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई-४०००३२
दिनांक : 24 AUG 2020

संदर्भ : १) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.पीयुबी-२०००/प्र.क्र.७३/२०००/३४, दि.१ मे, २००१
२) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.जाहिरात-२००९/प्र.क्र.१३७/३४, दि.३१ ऑगस्ट, २००९
३) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.मावज-२०१८/प्र.क्र.३४८/३४, दि.२० डिसेंबर, २०१८
४) आदेश क्र.जाहिरात/अपपुप्र/२०१९-२०/२७२, दि.१३ ऑगस्ट, २०२०

# <u>दर प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, **दैनिक सकाळ** हे वृत्तपत्र शासनमान्य जाहिरात यादीत **मोठे** या संवर्गात समाविष्ट आहे. संदर्भांकित क्र.३ च्या शासन निर्णयातील नियम क्र.४.५.२ मधील सूत्रानुसार आणि नियम क्र.४.५.५ व क्र.४.५.६ अन्वये अतिरिक्त दर देण्यात आला आहे. संदर्भ क्र.४ नुसार या नियकालिकाच्या महासंचालनालयाकडे उपलब्ध असलेल्या नोंदीनुसार **१५४५७४** या खपाच्या आधारे दरवाढ करण्यात आली आहे. जाहिरातीचा दर प्रति चौ.से.मी. **रु.१०७/- (रुपये एकशे सात फक्त)** निश्चित करण्यात आला आहे.

कृष्णधवल जाहिरातीच्या मूळ दरावर ४०% अधिक रंगीत दर देण्यात येत आहे. पहिल्या पानाकरिता, नाविन्यपूर्ण उपक्रमाकरिता (फ्रेंच विंडो, हाफ फ्लॅप, सोलो जाहिरात) ५०% अधिक दर तसेच जॅकेट पेजसाठी १००% अधिक दर त्याचप्रमाणे विशिष्ट पानावर जाहिरातीचा मजकूर प्रसिद्ध करण्यासाठी कार्यादेशात नमूद असल्यास २५% अधिक दर देण्यात येईल.

हा दर सर्व शासकीय विभाग, कार्यालये, महामंडळे, मंडळे, प्राधीकरणे, उपक्रम, आयोग, स्थानिक स्वराज्य संस्था, इतर स्वायत्त संस्था, जिल्हा परिषद, नगर परिषद, शासन पुरस्कृत सहकारी संस्था इत्यादींच्या वर्गीकृत व दर्शनी जाहिरातींना लागू राहतील.

उपरोक्त नमूद केलेली नियमावली आणि दर दि.१३ ऑगस्ट, २०२० पासून अंमलात आले आहेत.

**संचालक (माहिती)**
**(वृत्त व जनसंपर्क)**

टिप : दि.१३ ऑगस्ट, २०२० पासून अंमलात येतील. जाहिरातीच्या प्रत्येक देयकासोबत या आदेशाची प्रत जोडण्यात यावी.

प्रति,

संपादक / जाहिरात व्यवस्थापक,
दैनिक सकाळ, मराठी
औरंगाबाद